राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत विदर्भ मराठवाडा विशेष दुग्ध प्रकल्पास सन २०१७-१८ करिता निधीचे नियतवाटप मंजूर करणे तसेच निधी वितरीत करणेबाबत .

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: राकृवि -०३१७/प्र.क्र. १४/राकृवियो कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०४२

तारीख : १८ सप्टेंबर, २०१७

वाचा :

१. कृषि व पदुम विभागाचा शा. निर्णय क्र.०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३/०४/२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
३. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१७-आरकेव्हीवाय, दि. १५/०५/२०१७
४. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र नं. १-१५/२०१७/आरकेव्हीवाय, दि. २४/०५/२०१७
५. राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या २३ व्या बैठकीचे इतिवृत्त पत्र क्र. आरकेव्ही-०३१७/प्र.क्र.१४/राकृवियो कक्ष, कृषि व पदुम विभाग, दि.०९/०६/२०१७
६. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७ आरकेव्हीवाय/१, दि. १६/०६/२०१७
७. कृषि व पदुम विभागाचा शा. निर्णय क्र.०३१७/प्र.क्र.१४/राकृवियो कक्ष, दि. ०३/०७/२०१७
८. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.२०१७/प्र.क्र.११३/पदुम-४, दि. २१/०७/२०१७
९. कृषि व पदुम विभागाचे पत्र क्र. एमएलके-२०१७/प्र.क्र.११३/पदुम-४, दि. ०७/०९/२०१७

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजना केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अर्थसहाय्याने राबविण्यात येत असून संदर्भांकित शासन निर्णय दि. ०३/०७/२०१७ अन्वये, चालू वर्षी राकृवियोंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे तसेच, चालू वर्षाकरिता केंद्र व राज्य हिस्याचा मिळून सर्वसाधारण प्रवर्गाकरिता ₹२७२.५० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

दि. २५/०५/२०१७ रोजी राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची २३ वी बैठक पार पडली असून सदर बैठकीतील निर्णय संदर्भांकित दि. ०९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर बैठकीत पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाडयातील दुग्धोत्पादन वाढविण्यासाठी सुमारे रु. ३४० कोटी गुंतवणूकीचा प्रकल्प मंजूरीसाठी सादर केला होता. या प्रकल्पातील काही घटकांची केंद्र शासनाने शिफारस केली होती तसेच, काही घटकांबाबत राज्य शासनाकडून अतिरीक्त माहिती मागविलेली होती. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी

समितीने सदर प्रकल्पास अंशत: मंजूरी प्रदान केलेली आहे आणि प्रकल्पातील अन्य घटकांना केंद्र शासनाची शिफारस प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रकल्प सुधारीत करुन केंद्र शासनास सादर करण्याचे सूचित केलेले आहे

सदर प्रकल्पाची चालू वर्षापासून अंमलबजावणी करणेहेतू पशुसंवर्धन विभागाने ‘विदर्भ मराठवाडा विशेष दुग्ध प्रकल्पांतर्गत’ ज्या घटकांची केंद्र शासनाने शिफारस केलेली आहे त्या घटकांची तातडीने अंमलबजावणी करण्यास संदर्भांकित दि. २१/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाने संदर्भांकित प्रकल्पाकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत चालू वर्षी निधी वितरण करण्याची विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः

१. ‘विदर्भ मराठवाडा विशेष दुग्ध प्रकल्पाची’ सन २०१७-१८ पासून अंमलबजावणी करण्याकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत चालू वर्षाकरिता एकूण रु. ३० कोटी निधीचे नियतवाटप (Allocation) मंजूर करण्यात येत आहे तसेच, सदर निधीपैकी प्रथम टप्प्यात एकूण रु. १२ कोटी निधी तातडीने वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. संदर्भांकित शासन निर्णय दि. ०३/०७/२०१७ अन्वये केंद्र व राज्याच्या ६०:४० अर्थसहभागाच्या प्रमाणात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत एकूण ₹ २७२.५० कोटी निधी सर्वसाधारण प्रवर्गाकरिता वितरीत केला असून त्यापैकी ‘ऊस तोडणी यांत्रिकीकरण प्रकल्पाकरिता’ रु. १२ कोटी निधी उपलब्ध करुन दिला होता. ‘ऊस तोडणी यांत्रिकीकरण प्रकल्पाकरिता’ उपलब्ध करुन दिलेल्या रु. १२ कोटी निधीचे वितरण या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत असून सदर रु. १२ कोटी निधी (रुपये बारा कोटी फक्त) आयुक्त (पशुसंवर्धन) यांना ‘विदर्भ मराठवाडा विशेष दुग्ध प्रकल्पाच्या’ अंमलबजावणीकरिता उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुषंगाने, आयुक्त (कृषि) यांनी ऊस तोडणी यांत्रिकीकरण प्रकल्पाचे निधी वितरण रद्द करुन सदर प्रकल्पाच्या रु. १२ कोटी निधीचे आयुक्त (पशुसंवर्धन) यांना वितरण करावे.

३. रु. १२ कोटी निधी केंद्र व राज्य हिस्याच्या ६०:४० प्रमाणात सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध करुन देण्यात येत असून तो चालू वर्षीच्या तरतूदीतून पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा

केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
मागणी क्रमांक डी -३ २४०१- पीक संवर्धन (००) (८००) इतर खर्च (००) (०९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (६० टक्के केंद्र हिस्सा) (२४०१ ८२३५) ३३-अर्थसहाय्य	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (८००) इतर खर्च (००) (११) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (४० टक्के राज्य हिस्सा)(२४०१ A२२५) ३३-अर्थसहाय्य

४. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सन २०१६-१७ पर्यंत विविध विभागांना वितरीत केलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन तसे प्रमाणित केल्यानंतर सदर योजनेंतर्गत उर्वरीत निधी दुसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येणार आहे, त्यामुळे सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी/विभागांनी त्यांना सन २००७-०८ ते सन २०१६-१७ या कालावधीत वितरीत केलेल्या निधीचे सनदी लेखापालांकडून लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करावे.

५. सर्व विभागाच्या / अंमलबजावणी यंत्रणांच्या वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांतर्गत केवळ आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२८१७१५४७३८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.09.28 17:12:07 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. आयुक्त (पशुसंवर्धन), पुणे
७. आयुक्त (दुग्धव्यवसाय), वरळी, मुंबई
८. व्यवस्थापकीय संचालक (महाबीज), अकोला.
९. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१०.संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
११.संचालक, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१२.महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे.

१३.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१४.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१६.सहायक संचालक (लेखा-१), कृषिआयुक्तालय, पुणे
१७.वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१८. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१९.निवड नस्ती.